**आर.जे.ई. क. ०१/२०१८**
**पंढरीनाथ वि. कोणीही नाही**

**<u>निशानी क. १ वरील आदेश</u>**
**<u>दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८</u>**

**१)** प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यानी बॉम्बे रेग्यूलेशन कायदयाचे (यानंतर 'सदर कायदा' असे संबोधण्यात येत आहे) कलम ३ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**अर्जदारांचे म्हणणे थोडक्यात खालीलप्रमाणे आहे:**

**२)** अर्जदार पंढरीनाथ भिसे याचे काका तुकाराम संभाजी भिसे हे जवळा मुरहार ता. मुदखेड येथील रहिवाशी होते व त्यांचा मृत्यु दि. ०५.०८.१९८८ रोजी रोजी वयोवृद्ध असल्यामुळे जवळा मुरहार ता. मुदखेड येथे झालेला आहे. त्याबाबत ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत जवळा मुरहार ता. मुदखेड यांनी मृत्युचा दाखला दिलेला आहे. अर्जदार यांना शासकीय व इतर निम—शासकीय कामासाठी मयत तुकाराम संभाजी भिसे यांच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार यानी ग्रामपंचायत, जवळा मुरहार येथे जावून वारस प्रमाणपत्राची मागणी केली असता संबंधीत अधिका—यांनी वारस प्रमाणपत्र आणण्यास सांगितले. अर्जदार हेच मयत तुकाराम संभाजी भिसे यांचे कायदेशीर वारस आहे. म्हणून अर्जदार यानी प्रस्तुतचा अर्ज सादर केला.

**३)** या अर्जाच्या अनुषंगाने ''**श्रमीक एकजूट**'' या वृत्तपत्रामध्ये दि. ०६, जानेवारी, २०१८ रोजी **<u>नि.१३</u>** प्रमाणे जाहीर प्रकटन प्रकाशीत करून हरकती मागविल्या. परंतु या अर्जावर मुदतीमध्ये कोणताही आक्षेप दाखल केला नाही.

**४)** अर्जदारांचे वकील श्री. बी.एल. थोरात यांचा युक्तीवाद श्रवणोपरांत माझे समक्ष खालील मुद्दे विचारासाठी निर्माण झाले. ज्याची उत्तरे त्या खाली दिलेल्या कारणमिमांसेस्तव देण्यात आली.

| | मुद्दे | उत्तर |
|---|---|---|
| १ | अर्जदार हे बॉम्बे रेग्यूलेशन कायदयातील तरतुदी अन्वये वारसाहक्क प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**५) मुद्दा क. १ साठी:—**

अर्जातील कथने सिध्द करण्यासाठी अर्जदार पंढरीनाथ उकाजी भिसे यानी स्वत:ची साक्ष (नि.०९) प्रमाणे नोंदवून अर्ज (नि.१) मधील मजकूराचे पुनरूच्चारण केले आहे. अर्जदारांनी मयत तुकाराम संभाजी भिसे यांचे मृत्यु प्रमाणपत्र नि. १०, मयताचे वारस प्रमाणपत्र नि.क्र.११, अर्जदार यांचे आधार कार्ड नि.क्र.१२ व वर्तमानपत्रामधील जाहीर प्रगटन नि. १३ वर दाखल केलेले आहेत. अर्जदारांनी इतर पुरावा देणे नाही अशी पुरसिस नि.१४ वर दाखल केली.

**६)** पटलावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार याचे काका तुकाराम संभाजी भिसे हे दि. ०५.०८.१९८८ रोजी मयत झालेले आहेत व अर्जदार हे त्यांचे वारस आहे.

**७)** प्रस्तुत अर्जामध्ये दैनिक वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रगटन देवून सुध्दा मुदतीमध्ये अर्जदाराच्या मागणीसाठी कोणीही आक्षेप घेतलेला नाही. त्यामुळे अर्जदारांचा पुरावा अखंडीत राहीला. म्हणून अर्जदाराचा पुरावा जसाच्या तसा ग्राहय धरणे आवश्यक आहे. बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १९२७ नियम ३ चे तरतूदीन्वये कागदपत्रांचे अवलोकन केले असता अर्जदार यानी उपरोक्त नियमानुसार जाहीर नोटीसद्वारे याबाबत असलेल्या आक्षेपांची पुर्तता केली आहे. परंतु या न्यायालयाला केवळ वारसाहक्क प्रमाणपत्र देण्याबाबत सदर कायद्याने प्राधिकृत केले आहे. उपरोक्त तोंडी व लेखी पुराव्याचे

अवलोकन केल्यानंतर मी या मताशी आहे की, अर्जदार हे बॉम्बे रेग्यूलेशन कायदयातील तरतुदी अन्वये वारसाहक्क प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. सबब मुद्दा क्र १ चे उत्तर होकारार्थी दिले आहे.

**<u>मुद्दा क २ साठी</u>** :—

**८)** मुद्दा क्र १ चे उत्तर होकारार्थी दिल्यामुळे अर्ज मंजूर करणे न्यायोचित आहे. सबब मी खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| **१)** | प्रस्तूत अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| **२)** | अर्जदार पंढरीनाथ उकाजी भिसे हे मयत तुकाराम संभाजी भिसे यांचे कायदेशीर वारस म्हणून घोषित करण्यात येते. येणेप्रमाणे त्यांना वारसाहक्काचे प्रमाणपत्र देण्यात यावे. |

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत )

**(डी.एन.चामले)**
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
मुदखेड.

**दि. १५/०२/२०१८.**

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File judgment are same word to word, as per the original judgment.

Name of the stenographer : Syed Mazhar Ali
Court Name : CJJD, Mudkhed
Date: 15-02-2018
Judgment signed by the Presiding Officer on : 15-02-2018
Judgment Uploaded on : 15-02-2018